# -: निवेदन :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता स्थापत्य, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर या संवर्गातील पदे भरणेकरिता दिनांक 29/3/2015 रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेनंतर सदर पदांच्या उत्तरतालिका (Answer Key) त्याचदिवशी महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आल्या असून सदर उत्तरसूचींबाबत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास ते संदर्भासह दिनांक 1/4/2015 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत recruitment@pcmcindia.gov.in या ईमेलवर पाठविणेबाबतचे निवेदन, दिनांक 29/3/2015 रोजी महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आले आहे.

त्यानुसार सर्व्हेअर पदाचे उत्तरतालिका (Answer Key) वर कोणतेही आक्षेप प्राप्त झाले नसल्याने यापूर्वी प्रसिध्द करणेत आलेली उत्तरतालिका (Answer Key) कायम ठेवण्यात येत आहे. तसेच कनिष्ठ अभियंता स्थापत्य, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांचे उत्तरतालिका (Answer Key) वर उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत अंतिम निर्णय घेण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहेत.

1 कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न क्र.23,45 व 91 बाबतचे आक्षेप/सूचना ग्राहय धरणेत येत असून परीक्षेस उपस्थित असलेल्या सर्व परीक्षार्थींना त्याबाबत गुण देण्यात येत आहेत.

2 स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न क्र. 65 बाबतचे आक्षेप/सूचना ग्राहय धरणेत येत असून परीक्षेस उपस्थित असलेल्या सर्व परीक्षार्थींना त्याबाबत गुण देण्यात येत आहेत.

आयुक्त<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी 18

क्र.प्रशासन/3/कावि/ 481 /2015<br>
दिनांक20/4/2015